# वीर गणपती गणेशोत्सव, सोलापूर

वीर गणपती ट्रस्ट या गणेशोत्सव मंडळाची स्थापना सोलापूरातील युवकांनी सन २०११ साली सद्गुरुदेव श्री. श्रीनीवासजी काटकर यांच्या मार्गदर्शनाखाली केली असून श्री. सतीश सपकाळ - अध्यक्ष, श्री. अमोल सुपे, श्री. शेखर गणेश - उपाध्यक्ष, श्री. अवधूत ढगे - सचिव, श्री. रामदास सरवदे - सहसचिव, श्री. श्रीकांत सरवदे - खजिनदार, श्री. ऋषीकेश जिंदे - कार्याध्यक्ष, श्री. मधुकर मळेकर, श्री. मोहन माळवदकर, श्री. आनंद गायक वाड, श्री. तुळशीदास वांझरे - सदस्य हे युवक प्रमुख विश्वस्त आहेत.

श्री ची मूर्ती १५ फुटी असून सोलापूरचे शिल्पकार श्री. उमेश व्हरकट यांनी गणपतीचे विविध प्रकारचे स्केच तयार करुन श्री गणेशाचे विविध गुणरुप एकत्रीत करुन ही मुर्ती साकारलेली आहे. उदा. वरदहस्त, वक्रतुंड, लंबोदर, सुर्पकर्ण, भालचंद्र, एकदंत, मोरेश्वर व इतर अशा गुणरुपात सुबक व आकर्षक मुर्ती आहे. ही मुर्ती साकरण्यास शिल्पकारांना दीड वर्षाचा कालावधी लागला व श्री गणेश जयंती बुधवार दि. १३/०२/२०१३ रोजी ती मंडळात आणण्यात आली.

## वीर गणपती गणेशोत्सव

श्री गणेशाची प्रतिष्ठापना गणेश चतुर्थीला विधीवत पुजेने सकाळी सोलापूरातील मध्यवर्ती ठिकाणी श्री बालाजी मंदिर शेजारी, दाजी पेठ येथे करण्यात येते. वीर गणपती मंडळाच्या गणेशोत्सव काळात श्री च्या पुजेसाठी पोलिस आयुक्त श्री. प्रदिप रासकर, पालिस उपायुक्त श्री. सुभाष बुरसे, पालकमंत्री विजयकुमार देशमुख, आमदार कु. प्रणिती शिंदे, माजी आमदार श्री. शिवशरण पाटील, श्री. नरसय्या आडम, सामाजिक कार्यकर्ते ब्रिजमोहन फोफलिया, श्री. प्रकाश वानकर, उस्मानाबादचे सराफ व्यापारी श्री. संजय गणेश, ॲड. नितीन हबीब, नगरसेविका सौ. सुनंदा बल्ला, सौ. जयश्री फूलारे, नगरसेवक श्री. मेघनाथ येमुल, श्री. भारत महिंद्रकर, श्री. महेश गादेकर, श्री. सोनू मंठाळकर, श्री. बाळासाहेब गायकवाड, श्री. आप्पासाहेब म्हेत्रे व इतर अनेक मान्यवारांनी आजपर्यंत हजेरी लावली आहे.

उत्सव काळात अनेक गणेश भक्तपरिवार श्रींच्या पुजेचा लाभ घेतात, तसेच उत्सव काळात एक दिवस महिलांच्या हस्ते विशेष महाआरती व हळदीकुंकवाचे आयोजन करण्यात येते. पुजेस मोठ्या प्रमाणात महिला एकत्रीत येवून सामुहीक पुजा, हळदीकुंक कार्यक्रम करता व फक्त महिलांसाठी मनोरंजनाचे कार्यक्रम होतात. एक दिवस संपूर्ण महिलांसाठी राखीव कार्यक्रम असतात.

वीर गणपतीच्या दर्शनासाठी मोठ्या प्रमाणात गणेश भक्तांची गर्दी गणशोत्सव काळात होत असते. उत्सव काळात मंडळाच्या वतीने दक्षतेच्या दृष्टीने मंडपात व परीसरात सी.सी.टीव्ही कॅमेरे बसविण्यात येतात व प्रायव्हेट सिक्युरीटी ठेवण्यात येतो.

श्रींच्या विसर्जन मिरवणूकीत मोठ्या संखेने युवकांचा सवाद्य शिस्तबद्द लेझीमचा ताफा डोळ्याचे पारणे फेडणारे असे लेझीमचे डाव सादर करत असतो. विसर्जन मिरवणूक सोलापूर पूर्व विभाग मध्यवर्ती या प्रमुख मार्गे सिध्देश्वर तलाव येथे विसर्जीत होते.

मंडळाच्या वतीने सन २०१५ च्या गणेशोत्सव काळात सोलापूरचे ग्रामदेवत श्री सिध्देश्वर मंदिराच्या सुवर्ण सिध्देश्वर या प्रकल्पासाठी १ कोली चांदी देणगी रुपाने दिलेली आहे. तर सन २०१४ च्या गणेशोत्सव काळात दहा हजार वृक्ष लागवड व वाटप करुन पर्यावणाबद्दल जनजागृती केले. तसेच गरजु व गुणवंत विद्यार्थ्यांना शैक्षणीक मदत केली जाते. त्याच बरोबर धर्मरक्षणाचे कार्य मंडळाच्या वतीने निरंतर चालू असते.